जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक - १४७ दिनांक - २८/०२/२०२४**

सहकारनगर पोलीस स्टेशन,पुणे शहर

## इस्टेट एजंट असल्याचे भासवुन प्रॉपर्टी विकत घेण्याचे बहाण्याने घरात घुसुन दागिणे व मोबाईल चोरटयास केले जेरबंद

दि.१३/०२/२०२४ रोजी फिर्यादी यांना एक इसम तुमचे घर विकत घेण्यासाठी माझ्याकडे पार्टी असुन त्यांना घर पाहण्यासाठी घेवुन येत असल्याचे सांगितले. त्यावेळी त्यांना दुपारी १२.३० वा. ची वेळ दिली व कामासाठी निघुन गेले होते. काम आवरून साधारण दुपारी ०१.३० वा.चे सुमारास घरी आले असता खोलीत टेबलवर ठेवलेला दुसरा ॲपल कंपनीचा आयफोन मोबाईल फोन घेण्यासाठी गेले असता त्यांना मोबाईल फोन मिळुन आला नाही. त्यावेळी त्यांनी त्यांचे आईला मोबाईल मिळुन येत नाही असे विचारले त्यावेळी आईने एक इसम ११/३० वा.चे सुमारास घरी आला होता. तो माझ्या शेजारी बसला व घर पाहुन येतो असे म्हणून आतील खोलीत गेला होता असे फिर्यादी यांना त्यांचे आईने सांगितले. त्यावेळी त्यांना आईच्या गळयात तीचे सोन्याचे मंगळसुत्र दिसले नाही त्याबाबत तीला विचारले असता तीने उशीखाली ठेवले होते असे सांगितले. त्यानंतर आईच्या उशाला ठेवलेले तीचे सोन्याचे मंगळसुत्र व आयफोन कंपनीचा मोबाईल फोन चोरून नेल्याची खात्री झाल्याने त्याबाबत **सहकारनगर पोलीस ठाणे येथे गुरनं ६२/२०२४ भा.द.वि. कलम ३८०** प्रमाणे गुन्हा दाखल केला होता.

सदर गुन्हयाचे तपासाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री सुरेंद्र माळाळे सहकारनगर पोलीस स्टेशन यांनी मार्गदर्शन व सुचना देवुन तपास पथकातील पोलीस अधिकारी व पोलीस अंमलदार यांना आदेश दिलेने सदर गुन्हयाचे अनुषंगाने वेगवेगळया भागातील सीसीटीव्ही फुटेज प्राप्त केले त्यावरून पोलीस अंमलदार **अमोल पवार व विशाल वाघ** यांनी बातमीदारामार्फत बातमी मिळाली की सदर सोन्याचे मंगळसुत्र व आयफोन कंपनीचा मोबाईल फोन चोरणारा इसम हा उरुळी कांचन पुणे भागात आहे अशी खात्रीशिर बातमी मिळाल्याने,पोलीस अंमलदार यांची एक टीम तयार करुन त्यांना सुचना व मार्गदर्शन करून बातमीचे ठिकाणी जावुन कारवाई करण्याचे आदेश दिले त्यानुसार सहकारनगर पोलीस स्टेशन तपास पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी बातमीचे ठिकाणी जावुन छापा टाकुन आरोपीस ताब्यात घेवुन नाव पत्ता विचारता त्याने त्याचे नाव **अनिल ज्ञानेश्वर मलठणकर, वय ५८ वर्षे रा.चाळ नं.२३ घ नं.१७७, आंबेडकर शाळेसमोर, लक्ष्मीनगर पर्वती पुणे** असे सांगितले त्याची झडती घेता त्याचे ताब्यातुन **१०,०००/- रु किं.चा एक ॲप्पल कंपनीचा आयफोन ७ मॉडेलचा मोबाईल फोन व ३६,०००/- रु किं.चे एक सोन्याचे मंगळसुत्र असा एकुण ४६,०००/- रु किंमतीचा मुद्देमाल हस्तगत** करण्यात आला आहे.

सदरची कामगीरी मा.अपर पोलीस आयुक्त पश्चिम प्रादेशीक विभाग श्री.प्रविणकुमार पाटील पोलीस उपायुक्त परिमंडळ-२, श्रीमती स्मार्तना पाटील मा.सहा.पोलीस आयुक्त, स्वारगेट विभाग नंदिनी वग्यानी सहकारनगर पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुरेंद्र माळाळे, यांचे मार्गदर्शनाखाली तपास पथकाचे सहा.पो उप निरी बापु खुटवड, पोलीस अंमलदार अमोल पवार,विशाल वाघ,सागर सुतकर,बजरंग पवार,किरण कांबळे,महेश मंडलिक,निलेश शिवतारे,नवनाथ शिंद,सागर कुंभार यांनी केली आहे.

